POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-१९९ ● मुंबई, बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.


MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण

## मुख्यमंत्र्यांकडून कारवाईचे आदेश... सायबरच्या आयजीना निर्देश

**■मुंबई। प्रतिनिधी :**


अभिनेता विकी कौशलची प्रमुख भूमिका असलेला आणि दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचा छावा चित्रपट सध्या बॉलिवूड विश्वात धुमाकूळ घालत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि बलिदानाची कथा या सिनेमाच्या माध्यमातून ७० मिमी पडद्यावर साकारण्यात आली असून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद या सिनेमाला मिळत आहे. सिनेमातील अनेक सीन अंगावर शहारे आणणारे आहेत, तर काही सीन्स पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू तरळल्याचंही दिसून येतं. त्यातच, बुधवारी १९ फ्रेबुवारी रोजी छपत्रती शिवाजी महाराजांची जयंती साजरी होत असून 'छावा' चित्रपटामुळे देखील संभाजी महाराजांच्या बलिदानाची कथा अभिमानाने आणि तितक्याच संवेदनेनं समोर येत आहे. मात्र, इंटरनेट विकिपीडियावर छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिवभक्तांनी संताप व्यक्त केला आहे. इतिहास अभ्यासक आणि शिवप्रेमींकडून हा मजकूर हटविण्याची मागणी केली जात आहे. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडियावर इंग्रजीत आक्षेपार्ह लिखाण केलेलं आहे. यासंदर्भात, आपण सायबरच्या आयजींना सांगितलं आहे. तसेच, विकिपीडियावर संपर्क करत याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. छत्रपती संभाजी महाराज हे आमचे आदर्श आहेत, त्यांच्यासंदर्भात असले लेखन खपवून घेणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले. आपल्याला कल्पना आहे की विकिपीडीया हे भारतातून संचालित होत नाही, त्यांचे नियम आहेत. यासंदर्भातील एडिटोरीयल राईट्स कोणाकडे असतात हे पाहिलं जाईल. ऐतिहासिक गोष्टी तोडून मोडून करण्यापेक्षा नियमावली तयार करा, अशा सूचना आपण देऊ असे




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. माध्यमांची भौगोलिक रचना होती, मात्र आता समाज माध्यमामुळे ती नाही. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. मात्र, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असीमित नाही, दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर कोणीही घाला घालू शकत नाही. यासंदर्भात नियमावली तयार करता येईल का? याचा विचार सुरू आहे. दरम्यान, विकिपीडियातील मजकूरसंदर्भात कारवाई केली जाईल, असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

### छत्रपती संभाजी महाराजांबद्दल केआरकेच्या वादग्रस्त ट्विटप्रकरणी फडणवीसांची आक्रमक भूमिका

स्वयंघोषित चित्रपट समीक्षक कमाल आर. खान ऊर्फ केआरके याने छत्रपती संभीज महाराजांबद्दल एक्स (ट्विटर) अकाऊंटवर आक्षेपार्ह पोस्ट लिहिली आहे. छत्रपती संभाजी महाराजांबद्दल ट्विट करताना केआरकेनं सर्व मयार्दा ओलांडल्या आहेत. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. केआरकेनं विकिपीडियाचा आधार घेत पोस्ट लिहिली होती. विकिपीडियाशी संपर्क साधून वादग्रस्त मजकूर काढण्याचे आदेश फडणवीसांनी दिले आहेत. सायबर विभागाचे आयजी यशस्वी यादव यांना फडणवीसांनी हे आदेश दिले आहेत. ''विकिपीडियावर छत्रपती संभाजी महाराजांबद्दल जो वादग्रस्त मजकूर लिहिण्यात आला आहे, त्याप्रकरणी सायबर विभागाचे आयजी यशस्वी यादव यांच्याशी संपर्क साधला आहे. विकिपीडिया आणि त्याच्याशी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून तो मजकूर काढून टाकण्याचे आदेश त्यांना दिले आहेत. त्यासाठी जी प्रक्रिया करावी लागेल, ती तातडीने करावी, असं त्यांना सांगण्यात आलं आहे. अशा पद्धतीचा आक्षेपार्ह मजकूर ओपन सोर्सवर राहणं अत्यंत चुकीचं आहे. त्यामुळे ते तिथून काढून टाकण्यासाठीचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. छत्रपती संभाजी महाराज हे आमचे आदर्श आहेत, त्यांच्यासंदर्भात असले लेखन खपवून घेणार नाही'', अशी प्रतिक्रिया फडणवीसांनी दिली.




### बैठकीपूर्वी कॅबिनेटचा अजेंडा बाहेर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतापले, मंत्र्यांना कारवाईचा स्पष्ट इशारा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी आपल्याच मंत्र्यांवर संतापले. मंत्रिमंडळ बैठक होण्यापूर्वी बैठकीचा अजेंडा बाहेर येत असल्यामुळे मुख्यमंत्री नाराज झाले. त्यांनी या बाबत आपल्या सहकारी मंत्र्यांना जाहीरपणे कानपिचक्या दिल्या. मुख्यमंत्री येथेच थांबले नाही त्यांनी गुप्ततेच्या शपथेची आठवणही मंत्र्यांना करुन दिली. त्यानंतरही हा प्रकार थांबला नाही तर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

**काय म्हणाले मुख्यमंत्री :** माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मंत्रिमंडळ बैठक होण्याचा अजेंडा छापणे चुकीचे आहे. बैठक होण्यापूर्वी काही लोक अजेंडा छापत आहे. याबाबत मी मंत्र्यांनाही सांगितले आहे. मंत्र्यांनी आपल्या कार्यालयांना बैठकीपूर्वी अजेंडा न छापण्याचे सांगितले पाहिजे. अन्यथा मला कारवाई करावी लागले. हा अजेंडा गुप्त असतो. त्या गुप्ततेची शपथ आपण घेतली आहे. तसेत माध्यमांनी सुद्धा आपल्या खपासाठी आणि टीआरपीसाठी नियम मोडू नये, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

**कल्याण-डोंबिवलीकरांसाठी सर्वोच्च न्यायालयात जाणार :** कल्याण डोंबिवली महापालिका परिसरातील घरांचा विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मत व्यक्त केले. या ठिकाणी बोगस महारेरा प्रकरणातील साडेसहा हजार रहिवाशी बेघर होण्याची शक्यता आहे. याबाबत उच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानंतर महापालिकेने ४८ इमारतींमधील रहिवाशांना पुढच्या दहा दिवसात घरे खाली करण्याची नोटीस पाठवली आहे. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, कल्याण डोंबिवली संदर्भात मी स्वतः बैठक घेत आहे. या ठिकाणी गरजू लोकांची घरे कशी वाचवता येईल, त्याचा विचार केला जाणार आहे. त्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात देखील जाऊ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. रवींद्र चव्हाण यांनी घटना लक्षात आणून दिली आहे. त्यानंतर संबंधित बिल्डरवर कारवाई करा, असे आदेश आपण पोलिसांना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. त्या ठिकाणी काही इमारती सरकारी जागेवर बांधल्या आहेत. त्यामुळे सर्व बाजूने या प्रकरणाचा तपास करावा लागणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक वैद्यकीय कक्ष स्थापन केला आहे. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वैद्यकीय कक्ष मी पण चालवात होतो. त्यात चुकीचे काही नाही. उपमुख्यमंत्र्यांनी सुरु केलेल्या वैद्यकीय कक्षात काहीही गैर नाही.

## 'वेड्यांचं सरकार, राज्यात Y,Z करून...' : राऊतांचा टोला!

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राज्यामध्ये ऐतिहासिक मताधिक्यासहीत सत्तेत आलेल्या महायुती सरकारमध्ये मागील काही दिवसांपासून सुप्त संघर्ष सुरु असल्याच्या चर्चा सुरु आहेत. असं असतानाच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेत्यांच्या सुरक्षेत कपात केल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या आमदार आणि नेत्यांना वाय दजार्ची सुरक्षा होती. मात्र आता त्यात कपात



केल्यानं शिवसेना नेत्यांनी संताप व्यक्त केला. अनेक आमदारांसोबत एकच बॉडीगार्ड राहणार तर मंत्र्यांचीही वाय प्लस दजार्चे सुरक्षा असणार आहे. हा निर्णयावरुन पुन्हा एकदा फडणवीस-शिंदे वादासंदर्भात चर्चा सुरु असतानाच उद्धव ठाकरेंच्या पक्षाने या निर्णयावरुन निशाणा साधला आहे.

**शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार नाराज**

गेल्या काही दिवसांपासून महायुतीत सुप्त संघर्ष सुरू असल्याची राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू होती. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेला संघर्ष आता टोकाला गेल्याचं चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसात दोन्ही पक्षातील सुरू असलेल्या कुरघोडीचं राजकारणामुळे हा सुप्त संघर्ष टोकाला गेल्याचं बोललं जातंय. शिवसेना-भाजपमधील टोकाच्या संघर्षाला आता नवं कारण ठरलंय शिवसेना नेत्यांच्या सुरक्षेत करण्यात आलेली कपात. शिवसेना आमदारांची वाय दर्जाची सुरक्षा काढण्यात आलीय. त्यामुळे शिवसेनेचे आमदार नाराज झाल्याची माहिती आहे.

**वेड्यांचे सरकार**

याच मुद्द्यावरुन ठाकरेंच्या पक्षाचे प्रवक्ते तसेच राज्यसभा खासदार संजय राऊत यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना राऊत यांनी, ''त्यांनी या राज्यात वाय, झेड करून टाकली आहे. हे वेड्यांचे सरकार आहे. या मंत्रालयात वेड्यांची जत्रा आहे. मंत्रालयात फार गोंधळ आहे,'' असं राऊत म्हणाले. तसेच पुढे बोलताना, ''प्रचंड भ्रष्टाचार सुरू आहे. गृहनिर्माण खात्यात पैसे दिल्याशिवाय काम होत नाही. एसआरए म्हाडामध्ये अधिकाऱ्याची नेमणूक संबंधित मंत्र्यांना रोकडे देऊन केली जाते. लवकरच कोणत्या प्रकल्पासाठी किती पैसे दिले गेले याची माहिती मी उघड करेन,'' असंही राऊत म्हणाले.

**शिंदेंच्या समांतर सरकारवरुनही टोला**

एकनाथ शिंदे समांतर मंत्रालय चालवत असल्याची चर्चा असून यासंदर्भातही राऊतांनी आपलं मत व्यक्त केलं आहे. ''एकनाथ शिंदे स्वतःची स्वतंत्र कॅबिनेट घेतात त्यांच्या मंत्र्यांना त्यांनी सांगितलं आहे फडणवीसांचे आदेश पाळू नका. अशा प्रकारचं आव्हान एकेकाळी मुंबईच्या अंडरवर्ल्डमध्ये निर्माण झालं होतं. आता मंत्रालयातसुद्धा अंडरवर्ल्ड सुरू आहे. समांतर सरकार सुरू आहे. प्रतिसरकार सुरू असेल तर राजकीय अराजक निर्माण झाले आहे मंत्रालयात,'' असं राऊत म्हणाले. पुढे बोलताना राऊतांनी, ''देवेंद्र फडणवीस हे मोडून काढणार नसतील तर हे राज्य आराजगाच्या खालीच ढकलले जाईल,'' अशी भीती राऊतांनी व्यक्त केली. ''५६-५७ आमदार ईव्हीएमच्या ताकदीवर निवडून आणले भाजपाने, ते आता सरकारला आव्हान देत आहेत,'' असंही राऊत म्हणालेत.

### 'बिल्डरने बनावट कागदपत्रे तयार करून राजकीय...'

डोंबिवलीमधील ६५०० कुटुंब बेघर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. महारेराच्या माध्यमातून करण्यात सर्वात मोठा घोटाळा उघडकीस आल्यानंतर येत्या काही दिवसांत डोंबिवलीत ६५ बेकायदा इमरती जमीदोस्त केल्या जाणार आहेत. या बेकायदा इमारती पाडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले असून घरं जमीनदोस्त झाल्यानंतर इथं राहणाऱ्या ६५०० कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ येणार आहे. याच मुद्द्यावरुन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या पक्षाने थेट भारतीय जनता पार्टी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबरच त्यांच्या खासदारपुत्रावर निशाणा साधला आहे.

**वेदना सरकारला होत नाही का?**

ठाकरेंच्या पक्षाचे प्रवक्ते तसेच राज्यसभा खासदार संजय राऊत यांना पत्रकारांनी डोंबिवलीमधील या बेकायदेशीर ६५ इमारतींबद्दल प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना राऊतांनी, ''प्रश्न असा आहे की सरकार काय करतं? जनतेच्या भावनेतून हे सरकार आलेलं आहे असं देवेंद्र फडणवीस सांगतात. अजित पवार सांगतात. एकनाथ शिंदे सांगतात. डोंबिवली मध्ये ६२ इमारतींवर बुलडोझर चालवला किमान साडेसहा ते सात हजार कुटुंब रस्त्यावर आले याची जबाबदारी कोणत्या सरकार घेणार त्या भागाचे आमदार रवींद्र चव्हाण आहेत. बिल्डरने बनावट कागदपत्रे तयार करून राजकीय पाठबळ मिळून शासकीय यंत्रणा ताब्यात घेतली. या घरांवर नागरिकांना कर्ज मिळाले आहेत. ६५०० कुटुंबं एका क्षणात रस्त्यावर येता त्याची वेदना सरकारला होत नाही का?'' असा सवाल उपस्थित केला आहे.

**थेट गौतम अदानींचा उल्लेख**

''गौतम अदानी, त्याच्या प्रकल्पासाठी इतके मेहनत केली जाते तर या सरकारने डोंबिवलीच्या साडेसहा हजार लोकांवर मेहरबानी केली असती तरी लोक बेघर झाली नसती,₹ असा टोला राऊतांनी लगावला. ₹रवींद्र चव्हाण पळून जात आहेत लोकांना भेटी देत नाहीत हा काय प्रकार आहे?'' असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. ₹तुम्ही मस्साजोग सरपंचांचा विषय घेत आहात दुसरीकडे ६००० लोकांना बुलडोझर खाली चिरडून मारलं दोन्ही ठिकाणी मृत्यूच आहे, मरण आहे,₹ असंही राऊत म्हणाले. तसेच पुढे बोलताना, ''६ हजार ५०० घराच्या प्रकरणांमध्ये कोण राजीनामा घेणार रवींद्र चव्हाण या भागामध्ये अनेक वर्ष आमदार आहेत, ते राजीनामा देणार का?'' असा सवाल राऊतांनी विचारला आहे.

**आम्ही जर रस्त्यावर आलो तर...**

''तिथले सत्ताधारी मंत्री, पालकमंत्री ते राजीनामा देणार का? त्या भागाचे खासदार कोण आहेत ते राजीनामा देणार का?₹ असा सवाल उपस्थित करत संजय राऊतांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच त्यांचे पुत्र आणि स्थानिक खासदार श्रीकांत शिंदेंचा थेट उल्लेख न करता निशाणा साधला. ₹लोक आमच्याकडे येत आहेत हा विषय सरकारपर्यंत जावा. आम्ही जर रस्त्यावर आलो तर तुम्ही देशद्रोहाचा गुन्हा दाखल कराल,'' असा टोला राऊतांनी लगावला आहे.

## एवढे दिवस काय गोट्या खेळत होते का?

## अजित पवारांचा जितेंद्र आव्हाडांवर निशाणा, सगळंचं काढलं



### आपला पक्ष सर्व धर्म समभाव विचारधारा घेऊन जाणारा आहे

सर्व धर्म समभाव विचारधारा घेऊन जाणारा पक्ष आहे. छत्रपती स्वराज्यरक्षक संभाजीराजे यांच्यावर चित्रपट निघाला आहे. हा चित्रपट पाहताना अंगावर शहारे येतात. अतिशय चांगला चित्रपट बनवला आहे असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. ठाणे जिल्ह्यात 6 महानगर पालिका आहेत. महायुतीला भर भक्कम पाठिंबा दिला आहे. भाजप त्यांचा पक्ष वाढवत आहे. शिवसेना त्यांचा पक्ष वाढवत आहे. आता आपल्याला देखील आपला पक्ष वाढवायचा आहे असे अजित पवार म्हणाले. अभिजीत बाबत बरीच माहिती होती, तो कुणासोबत काम करत होता हे मला माहिती आहे. तो आमचाच नातलग आहे. आता पवारच यायला उशीर करायला लागले तर मग बाकी कधी आपल्याकडे येतील असेही अजित पवार म्हणाले. अनेकांचे फोन सुरु होते की अभिजीत कुठे जाऊ नकोस आपण बसून बोलुयात, चर्चा करूयात मार्ग काढूयात. कधी मार्ग काढणार होते? एवढे दिवस काय गोट्या खेळत होते का?

**■मुंबई। प्रतिनिधी :**

पक्षात नव्यांचा सन्मान केला जाईल, तर जुन्या लोकांचा मान राखला जाईल असं वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. पक्षात विकेंद्रीकरण करायचं आहे. सत्तेच विकेंद्रीकरण करायचं आहे असेही अजित पवार म्हणाले. जितेंद्र आव्हाडांचे स्वीय सहायक अभिजित पवार आणि हेमंत वाणी यांनी आज अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला त्यावेळी अजित पवार बोलत होते. अनेकांचे फोन सुरु होते की अभिजीत कुठे जाऊ नकोस आपण बसून बोलुयात, चर्चा करुयात मार्ग काढूयात. कधी मार्ग काढणार होते? एवढे दिवस काय गोट्या खेळत होते का? असा सवाल करत नाव न घेता अजित पवारांनी जितेंद्र आव्हाडांना टोला लगवला.

**अजित पवारांचा जितेंद्र आव्हाडांना टोला**

आम्ही राज्याचा अर्थसंकल्प सादर करत आहोत. आता राज्याला आर्थिक शिस्त लावायची गरज आहे. आम्ही लाडकी बहीण योजना बंद करणार नाही. ज्या पात्र आहेत त्यांना लाभ मिळणार आहे असेही अजित पवार म्हणाले. निरंजन डावखरे, प्रताप सरनाईक, गणेश नाईक यासह असंख्य लोक राष्ट्रवादीत होते. ही लोकं केवळ एका व्यक्तीमुळं सोडून गेली आहेत, असं म्हणँत अजित पवारांनी जितेंद्र आव्हाडांना टोला लगावला. मी अनेकवेळा वरिष्ठांना सांगितलं मात्र त्यांनी ऐकलं नाही. मी म्हणत होतो कुठे माशी शिकतेय हे तरी पाहा असेही अजित पवार म्हणाले.

मला बुके देऊ नका शाल देऊ नका. पक्षाचे सभासद किती वाढवले ते सांगा असे-ही अजित पवार म्हणाले. कुठलाच मतदार कायमचा नसतो. सातत्याने मतदार विचार करत असतो त्यामुळे मतदार जोडणी कार्यक्रम करा असेही अित पवार म्हणाले.

## ...तर खैर नाही! बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत पुन्हा ॲक्शन मोडवर, १५० आरोपींना पोलिसांचा समज

**■पुणे। प्रतिनिधी :**

बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत पुन्हा ॲक्शन मोडवर आल्याचे पहावयास मिळाले आहे. हत्येचा प्रयत्न करणाऱ्या जिल्ह्यातील तब्बल दीडशे आरोपींना तंबी देण्यात आली आहे. सर्वच आरोपींना पोलिस अधीक्षक कार्यालयात मंगळवारी(१८ फेब्रुवारी) बोलाविण्यात आले होते. यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दुसऱ्यांदा गुन्हे करू नका, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी समज दिली.

आधी वाळू माफिया, त्यानंतर कुख्यात गुन्हेगारांना तंबी देण्यात आल्यानंतर आज कॉवत यांनी कलम ३०७ म्हणजेच हत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना धडकी भरविली आहे.




**बीड प्रकरणातील जवळजवळ सर्व आरोपींना अटक– पंकज भोयर**

बीड जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत. यावर मंत्री पंकज भोयर यांना विचारले असता या प्रकरणातील जवळजवळ सर्व आरोपीना अटक झालेली असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. तर या प्रकरणावर गृह विभाग अत्यंत गंभीर असून योग्य पद्धतीने चौकशी सुरू आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री भोयर यांनी दिली.

**सुरेश धस यांनी घेतली पोलीस महासंचालकांची भेट, कारण काय?**

राख आणि इतर आर्थिक गुन्ह्यांमधील त्या वादग्रस्त अधिकाऱ्यांची एसआयटी मार्फत चौकशी करा अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याकडे केली आहे. मुंबईतील पोलिसांच्या विशेष पथकाकडून ही चौकशी व्हावी, अशी मागणी ही त्यांनी केली आहे. निवडक पोलीस अधिकारी अनेक वर्षे बीडमध्ये कार्यरत असल्याचा आरोप सुरेश धसांनी यावेळी केला आहे.

काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात बेकायदेशीर आर्थिक व्यवहार आणि गुन्हेगारांना पाठबळ मिळत असल्याचे ही धस यावेळी म्हणाले आहेत. त्यामुळे या प्रकरणी आता नेमकी काय कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### बीड जिल्हा कारागृहाचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट

बीडच्या जिल्हा कारागृहाचं स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. याच कारागृहात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आणि मकोका अंतर्गत कारवाई केलेला वाल्मीक कराड कोठडीत आहे. देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने बीड जिल्हा कारागृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याच अनुषंगाने सोमवारी पोलीस अधीक्षकांच्या टीमने या संदर्भात आढावा घेतला आहे. दहा ते बारा बाबींवर कारागृहाचे ऑडिट होणार आहे. बीड जिल्हा कारागृह निजामकालीन असून इमारत कमकुवत आहे. कारागृहातील सीसीटीव्हीचे नूतनीकरण करण्याचेच आहे. त्याबरोबरच सुरक्षा यंत्रणा देखील अद्यावत गरजेचे असल्याचं यात म्हटले आहे.

## राज्यात उन्हाचा चटका

## हवामान तज्ञाने दिले तापमान वाढीचे कारण?

**■मुंबई। प्रतिनिधी :**



राज्यातील तापमानात अचानक बदल झाला आहे. दोन दिवसांपासून तापमान वाढले आहे. त्यामुळे उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. अचानक तापमान वाढल्यामुळे दुपारी अंगाची लाहीलाही होत आहे. राज्यातील कमाल तापमाचा पारा ३६ अंश सेल्सियसपर्यंत गेले आहे. अजून दोन दिवस राज्यात वाढलेले तापमान कायम असणार आहे. पुणे येथील हवामान विभाग तज्ञ सुदीप कुमार यांना अचानक वाढलेल्या तापमान वाढीचे कारण दिले आहे. हवामान विभाग तज्ञ सुदीप कुमार यांनी सांगितले की, राज्यात पुढील दोन दिवस ३४ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान असणार आहे. तापमानातील ही वाढ उत्तर भारतामध्ये झालेल्या हवामान बदलामुळे झाली आहे. अजून दोन दिवस उन्हाचा तडाखा राज्यात राहणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. साधारणपणे एक ते दोन सेल्सियसने कमाल आणि किमान तापमानात वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाचा आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# नैतिकतेचे वस्त्रहरण!

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या नावाने राज्यभर विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विरोधी पक्षांमधील नेते आकाशपाताळ एक करून त्यांनी राजीनामा देण्याची मागणी करीत आहेत. जोपर्यंत धनंजय मुंडे मंत्रिपदावर आहेत तोपर्यंत संतोष देशमुख हत्या प्रकरणाची निपक्षपाती चौकशी होऊ शकणार नाही, अशी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करणार्‍यांचे म्हणणे आहे. राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार आहे आणि खुद्द भाजपचे आमदार सुरेश धस हे दररोज बीड जिल्ह्यातील मनाचा थरकाप होणाऱ्या प्रकारांची पोलखोल करीत आहेत. त्यामुळे इतक्या भयंकर घटना या राजकीय वरदहस्ताशिवाय होऊ शकत नाहीत हे जनतेलाही माहीत आहे. बीड जिल्ह्याची सूत्रे ही मुंडे कुटुंबाकडे आहेत हेही सगळ्यांना माहीत आहे. राड आहे. मुंडे कुटुंबीयांचा तो एकेकाळी घरगडी होता. एक घरगडी ते आका असा त्याचा जो प्रवास झालेला आहे तो काही आपोआप झालेला नाही. त्याचे पालनपोषणकर्ते कुणीतरी असल्याशिवाय ते शक्य नाही. कारण राजकीय लोकांनी ठरवले तर एखाद्याच्या मुसक्या आवळून त्याला जोरबंद करायला त्यांना वेळ लागत नाही. कारण सगळ्या तपास यंत्रणा, राजकीय नेते कामाला लावू शकतात, गुन्हेगारांना तुरुंगात पाठवू शकतात, पण असे आका जर राजकीय नेत्यांचे वसुली एजंट असतील, तर मात्र त्यांना आळा कोण घालणार हा प्रश्न पडतो. पुढे हे असे आका दिवसेंदिवस गबर होत जातात. काही आका तर पुढे स्वतः राजकारणात उतरून राजकीय नेते होतात.धनंजय मुंडे यांच्यावर सातत्याने चारही दिशांनी आरोप होत असताना राज्य सरकार त्यांच्या पाठीशी आहे असेच चित्र दिसत होते, पण धनंजय मुंडे यांना होणारा विरोध हा दिवसेंदिवस वाढतच जात आहे. सुरुवातीला जोपर्यंत धनंजय मुंडे हे दोषी ठरणार नाहीत, तोपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही, अशी भूमिका त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी घेतली होती, पण बीडमधील एकामागून एक पुढे येत असलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे, राखमाफिया,वाळूमाफिया यांना मिळत असलेले राजकीय संरक्षण, त्याचसोबत धनंजय मुंडे यांच्या खासगी जीवनाविषयी झालेले आरोप, करुणा मुंडे यांना न्यायालयाने द्यायला सांगितलेली दोन लाखांची पोटगी, करुणा मुंडे यांचे सतत सुरू असलेले आरोप यामुळे आता धनंजय मुंडे यांच्यामुळे एकूणच राज्य सरकारची प्रतिमा डागाळली जात आहे. याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका पाहिली तर अजितदादा याबाबत तुम्हीच काय तो निर्णय घ्या अशीच राहिलेली दिसून येईल. अजूनपर्यंत अजितदादांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली, पण आता दादांच्याही डोक्यावरून पाणी जाताना दिसत आहे. त्यामुळे आपल्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले तेव्हा नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला होता. पदावर राहणे माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला पटत नव्हते. आता बीड प्रकरणात धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायचा की नाही हे त्यांनीच ठरवावे. त्यामुळे आता अजितदादांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण करणे थांबवल्याचे संकेत मिळत आहेत असेच दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नैतिकतेच्या मुद्यावर यापूर्वी ज्या नेत्यांनी राजीनामे दिले त्यांची उदाहरणे देऊन धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा अलीकडचा काळ पाहिला तर नैतिकतेचा नेमका अर्थ काय यावर खरंतर एखादा आयोग नेमून त्याचे संशोधन करावे लागेल अशी सध्या नैतिकतेची विविधांगी विभागणी झाली आहे. जसे अलीकडच्या काळात विविध राजकीय पक्ष फुटून वेगळे पक्ष निर्माण झाले, पण त्या पक्षाचा प्रमुख म्हणवला जाणारा नेता म्हणतो की, खरा पक्ष आमचा आहे. त्यामुळे लोकांना खरा पक्ष कुणाचा, असा प्रश्न पडतो. जसे हिंदुत्वावर दावा करणारे विविध पक्ष आहेत आणि खरे हिंदुत्व आमचेच असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे लोकही संभ्रमात पडतात. तसेच नैतिकतेचेही झालेले आहे. नैतिकतेचा नेमका अर्थ काय याविषयी संभ्रम निर्माण व्हावा अशी स्थिती आहे. खरंतर महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राजकारणातील नैतिकतेचे वस्त्रहरण व्हायला सुरुवात झाली. आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळत नाही म्हणून उद्धव ठाकरे यांनी भाजपची साथ सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा हात धरला. महाविकास आघाडीत प्रवेश केला. त्यानंतर भाजपच्या महाशक्तीच्या पाठबळावर एकनाथ शिंदे यांनी बंड करून शिवसेना नाव आणि चिन्हासह आपल्या ताब्यात घेतली. त्यावर निवडणूक आयोगाकडून शिक्कामोर्तब करून घेतले. तीच परिस्थिती अजित पवार यांची आहे. त्यांनी पहिले बंड केले होते, ते फसले. त्यामुळे त्यांनी भाजपच्या मदतीने दुर्सयांदा बंड करून राष्ट्रवादी काँग्रेस आपल्या ताब्यात घेतली. आता ते धनंजय मुंडे यांना नैतिकतेचा सल्ला देत आहेत.

# महाराज, आम्हांस क्षमा असावी!

**श्रीमानयोगी छत्रपती शिवाजी महाराज, आपल्या चरणी साष्टांग दंडवत. हे पत्र लिहिताना मनाला अतीव वेदना होतात. तुम्ही रक्त सांडून उभे केलेले हे स्वराज्य आम्ही मिरवणुकांच्या धिंगाण्यात गहाण टाकतो. तुमच्या तलवारीचे तेज आमच्या आत्म्याला झगझगत नाही, तुमच्या न्यायाचे धारिष्ठ्य आमच्या कृतीत उतरले नाही. महाराज, आमच्या ढोंगी शिवभक्तीचा मुखवटा तुमच्या तेजस्वी दृष्टिक्षेपात भस्मसात होईल याची आम्हांस भीती वाटते. आम्ही पुन्हा पुन्हा तुम्हाला विसरतो, पुन्हा पुन्हा चुकतो. म्हणूनच महाराज, आम्हांस क्षमा असावी!**

महाराज, काळ बदलला तसे आम्हीही बदललो. तुमच्या स्वराज्यास लायक न राहिलो. तुम्ही उभारलेले स्वराज्य आमच्या स्वाथार्साठीच वापरू लागलो. महाराज, आपला वा आपल्या ह्यछाव्याह्नचा पराक्रम दर्शवणारा एखादा चित्रपट येतो तेव्हाच आमचा ऊर दाटून येतो. त्याच काळात आम्ही आपला जयघोष करतो. तीन तासांच्या खेळानंतर आम्ही धाय मोकलून रडतो.

त्यामुळे आता ही मंडळी महाराजांचे तत्त्व अंगीकारेल वगैरे खुळा समज कुणाचाही होऊ शकतो, पण यत्किंचितही तसे होत नाही. आम्ही आपणास आणि आपल्या छाव्यास पुन्हा विसरून जातो. म्हणून महाराज आम्हांस क्षमा असावी. महाराज, आज जिकडे तिकडे तुमची चित्रे दिसतात. विचार मात्र कुठेच नाहीत. शिवभक्त हा केवळ गजर करणारा आणि फड उभारणारा नव्हे, तर तुमच्या तत्त्वांवर चालणारा असायला हवा हे कुणाला उमजलेलेच नाही.

महाराज, आज तुमची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी होतेय. ही जयंती नक्की कधी यावरही आम्ही लढत होतो. अखंड भारताला आपल्या कवेत घेण्याची ताकद असलेल्या या बापाची जयंती दोनदा साजरी केली तर बिघडले कुठे असते? पण तितकी समज, बुद्धी आमच्या माथ्यांमध्ये असायला हवी ना...

महाराज, तुम्ही स्वराज्यासाठी जीवाची पर्वा केली नाही. रणांगणात लढलात. कधी निजामशाहीशी, कधी आदिलशाहीशी, तर कधी मुघलांशी समोरासमोर उभे राहिलात, परंतु आम्ही लढाई सोडून केवळ निष्क्रियतेत रमलो. तुम्ही रयतेस पोटच्या पोराप्रमाणे जपलेत, त्यांच्या सुख-दुःखाची काळजी वाहिली अन् कोणत्याही स्थितीत त्यांच्यावर अन्याय होऊ दिला नाही, परंतु आजची अवस्था पाहिली असती तर तुमच्या काळजात कट्यार खुपसली गेल्यासारखे वाटले असते. महाराज, आज राज्यकर्ते स्वाथार्ने ग्रासले आहेत.

त्यांस रयतेचे काही देणेघेणे उरले नाही. लोकांस न्याय मिळावा, त्यांस सुख लाभावे या गोष्टी क्षुद्र झाल्या आहेत. जो मोठा तोच खरा. जो श्रीमंत तोच सज्जन आणि जो राजकारणी तोच न्यायाचा ठेकेदार असे अवास्तव नवे नियम समाजात रूढ झाले आहेत.

महाराज, तुम्ही न्यायप्रिय होता, सत्याचे धारक होता. स्वराज्यात न्यायाचा डोलारा हा कुणाच्याही सत्तेच्या जोखडाखाली नव्हता, तो केवळ सत्याच्या मागार्नेच उभा होता. तुम्ही न्यायासाठी आप्तेष्टांसही शिक्षा केलीत, गाढवावरून फिरविले; परंतु आजच्या काळी न्याय हा सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुलेच बनले आहे.

न्याय मागणारे लेकरू जर निर्धन असेल, दुर्बळ असेल, तर त्याच्या हंबरड्यास उत्तर मिळत नाही आणि ज्या हातांस रक्त सांडायची सवय आहे, त्यांस मात्र राजाश्रय लाभतो. आज न्यायदानाच्या पद्धतीत 'एन्काऊंटर' नावाचे अनधिकृत हत्यार आले आहे. यांत केवळ संशयित नव्हे, तर संपूर्ण न्यायव्यवस्थाच मारली जाते.

महाराज, तुम्ही ज्या भगव्या ध्वजास मान दिला, ज्या ध्वजासाठी मावळ्यांनी रक्त सांडले, त्या ध्वजाची आज दयनीय अवस्था पाहून मन हेलावते. तुमच्या काळी हा ध्वज स्वाभिमान होता. तो मावळ्यांच्या सन्मानाचा साक्षी होता. तुम्ही गडांवर जिथे हा ध्वज रोवला, तेथून अन्याय, अत्याचार कायमचे नष्ट झाले. मावळे त्या ध्वजासाठी हसत हसत रणांगणात गेले, मृत्यूला मिठी मारली, पण त्या ध्वजाची शान झुकू दिली नाही. आज मात्र महाराज, त्यास फक्त उत्सवापुरते उभे केले जाते आणि त्यानंतर विसरले जाते.

महाराज, आज स्वराज्याची अस्मिता केवळ प्रतिकांपुरती उरली आहे. जयघोष करणे, गडकोटांवर भगवे झेंडे लावणे, तुमच्या नावाने घोषणा देणे एवढेच आम्हांस ज्ञात आहे, परंतु त्या घोषणांमागील ऊर्जेस आम्ही हृदयाशी धरले काय? महाराज, स्वराज्याच्या ध्वजाखाली रणसंग्राम गाजवणार्‍या पराक्रमी मावळ्यांचे आजचे रूप ते काय? महाराज, तुमचे वीर मावळे आज पंचतारांकित उपहारगृहांबाहेर सुरक्षा रक्षकांच्या वेशात उभे दिसतात.

विवाह मंडपाच्या प्रवेशद्वाराशी सजविलेले मावळे उभे करून धनिकांचे मनोरंजन केले जाते आणि जिजाऊंच्या वेशातील कन्यका त्या देखाव्यास शोभा वाढवण्यासाठी ठेवतात. महाराज, हा अपमान पाहून तुम्हांस संताप अनावर होईल. ज्या हातांनी शत्रूंचे बळी घेतले, तेच हात आज केवळ दारावर उभे राहण्यास उपयोगी पडत आहेत. ज्या वीरपत्नींनी मावळ्यांचे धैर्य वाढविले, त्या मातांचाच सन्मान आता केवळ देखाव्यासाठी होत आहे. हे पाहून मन विदीर्ण होते महाराज! आम्ही तुमचे वारस आहोत का? की केवळ तुमच्या नावाने आपली दुकाने चालविणारे स्वार्थी व्यापारी आहोत?

महाराज, तुम्ही घाम गाळून, रणधुमाळी खेळून, रक्त सांडून ज्या गडकोटांस उभे केले, त्या गडांचे आज आम्ही काय हाल करीत आहोत? आज आम्ही त्या गडांवर जाऊन जयघोष करतो, तिथे भगवे झेंडे लावतो, परंतु त्या गडांचे जतन करतो काय? जिथे तुमच्या मावळ्यांनी तलवारीच्या एका फटकाऱ्यात शत्रूची मुंडकी खाली केली, तिथेच आता काही महाभाग मद्याच्या बाटल्या रिकाम्या करतात.




एके काळी रणसंग्रामाने दुमदुमणाऱ्या या पवित्र गडांवर आता विकृतीचा धिंगाणा चालतो. महाराज, गड म्हणजे केवळ दगड-माती नव्हती, ती स्वराज्याची अस्मिता होती. त्या भिंती तुमच्या पराक्रमाच्या साक्षीदार होत्या, पण आज त्या भिंतींवर अश्लील लिखाण केले जाते, प्रेमाची नावे कोरली जातात अन् या पवित्र स्थळांचा बाजार केला जातो. म्हणूनच महाराज, आम्हांस क्षमा असावी!

महाराज, तुम्ही स्त्रीस उच्च स्थान दिले. तिच्या रक्षणासाठी कठोर कायदे केले. स्वराज्यात परस्त्रीस मातेसमान मानले अन् कुठल्याही रणांगणावर विजय मिळविला तरी स्त्रीस स्पर्श न करण्याची आज्ञा दिली, परंतु महाराज, आम्ही मात्र तुमच्या त्या शिकवणीस काळिमा फासला आहे. आज स्त्रियांस स्वराज्य असले तरी सुरक्षितता नाही. बलात्कार, छेडछाड, शारीरिक अन् मानसिक छळ या गोष्टी रोजच्या झाल्या आहेत. महाराज, परस्त्रीस मातेसमान मानणे दूर राहिले, पण आता स्वतःच्या घरातील स्त्रियाही राक्षसी वासना भोगत आहे. मुलीवर तिच्या पित्यानेच अत्याचार केला, भगिनीवर भावानेच लांच्छन दिले, अशा बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होतात.

महाराज, तुमच्या स्वराज्यात शेतकरी हा राज्याचा कणा होता. तुम्ही शेतकऱ्यांसाठी नवे कायदे केले, त्यांचे उत्पन्न वाढविण्यास सहाय्य केले, त्यांस करमाफी दिली. स्वराज्यात कुणीही उपाशी राहू नये म्हणून तुम्ही प्रत्येक कणसास किंमत मिळवून दिली. ज्यावेळी सरदार वा सैनिक शेतर्कयांस छळू लागले, त्यांच्या श्रमावर डल्ला मारूपाहिले, त्यावेळी तुम्ही त्यांस कठोर शिक्षा केल्या, परंतु महाराज, आजची स्थिती पाहिली असती तर तुमच्या तळपायाची आग मस्तकात पोहचली असती. गरीब शेतकऱ्यांवरील कर्ज वाढत आहे, त्यांचे पोट रिकामे आहे.

महाराज, तुम्ही कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता. मावळ्यांमध्ये हिंदूही होते, मुसलमानही होते, परंतु आज धर्माच्या नावावर भांडणे सुरू आहेत. जातीयवाद वाढला, समाज फुटला. तुम्ही माणुसकीचे राज्य उभारले, आम्ही ते जातीधर्मांत विभागले. म्हणूनच आम्हांस क्षमा असावी, महाराज, आम्ही तुमच्या स्वराज्याचे शिलेदार होण्याऐवजी स्वार्थाच्या गर्तेत लोळण घेत आहोत. आम्ही तुमच्या विचारांचे पालन करण्याऐवजी ढोलताशांच्या गजरात स्वतःस धन्य समजू लागलो. आम्ही तुमच्या शौर्यगाथांचे पोवाडे गातो, पण त्यातील विचार अंगीकारण्याचे धाडस करीत नाहीत.

आम्ही तुमच्या नावाचा घोष करतो, पण तुमच्या नीतीचा विसर पडला. हाच तो आमुचा अपराध, हेच ते आमुचे लांच्छन! आम्ही तुमच्या विश्वासास पात्र ठरलो नाही! गद्दारीचा जुनाच शाप आहे महाराज. त्या काळाप्रमाणे सांप्रत काळातही गनीम बाहेर कमी आणि घरातच जास्त आहेत. हे गनीमच घात करतात. गनिमी काव्याने या घातकी गनिमांचा फडशा पाडू तेव्हाच पुन्हा एकदा आपली स्वराज्याची पताका डौलाने फडकेल! तोपर्यंत महाराज, आम्हांस क्षमा असावी!

# मोदी- ट्रम्प वाटाघाटींमध्ये काय होऊ शकते?

**ट्रम्प यांची धोरणे अधिकाधिक ताठर होत असतानाही त्यांना 'डील'चा आनंद मिळवून देणे– तोही भारताचे हितसंबंध सांभाळून– हे आता मोदींच्या हातात आहे...**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात याच आठवड्यात होणारी चर्चा हा दोन्ही देशांमधील राजनैतिक इतिहासाची परीक्षा पाहणारा क्षण ठरणार आहे; कारण अमेरिकेला अनोळखी प्रदेशात नेणाऱ्या एका परिचित नेत्याशी भारत व्यवहार करत आहे. ज्यांच्या पहिल्या कार्यकाळात भारताने 'नमस्ते' केले ते राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हेच काय, इतका फरक गेल्या महिन्याभरातील त्यांच्या धोरणांमध्ये दिसून येतो आहे.

मोदी आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी गेल्या दशकभरात अनेक अवघड वाटाघाटी धकवून नेलेल्या असल्याने या आठवड्यातील ट्रम्प-मोदी भेटही फलदायी होईल, असे मानण्यास जागा उरते. गेल्या काही आठवड्यांतील भारताने काही राजनैतिक पावलेही यासाठी उचलली आहेत - मोदी आणि ट्रम्प यांच्यातील दूरध्वनी संभाषण, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि नवे अमेरिकी संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांच्यातील दूरध्वनी आणि परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माईक वॉल्ट्ज यांच्याशी जयशंकर यांनी केलेल्या गाठीभेटींचा समावेश यात आहे. नवीन अमेरिकी प्रशासनाच्या पहिल्या महिन्यात पंतप्रधान मोदी अमेरिकेस जात आहेत, हे महत्त्वाचेच. आजवर भारत-अमेरिका संबंध तसे चांगलेच म्हणायचे, परंतु या आठवड्यात काय होते याबद्दल उत्कंठाच असण्यालाही कारण आहे. जयशंकर यांनी म्हटल्याप्रमाणे, ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारतीय मुत्सद्देगिरीची जी परीक्षा घेतली आहे ती 'अभ्यासक्रमाबाहेरची' आहे.

हा 'अभ्यासक्रम' म्हणजे खरे तर, गेल्या २५ वर्षांत भारत आणि अमेरिकेने बसवलेली परस्पर-संबंधाची घडी! बिल क्लिंटन यांनी मार्च २००० मध्ये भारतास भेट दिली, तेव्हापासून ही घडी नव्याने बसू लागली. तेव्हापासून भारत-अमेरिका संबंध वृद्धिंगतच होऊ लागले, तेही जगाची तशी अपेक्षा नसताना. पाकिस्तान किंवा अण्वस्त्र प्रसारबंदी यांसारखे विषय हे या संबंधांत वादाचेच, पण ते अलगद बाजूला ठेवून त्याऐवजी सहकार्याच्या संधींकडे सकारात्मकपणे पाहाण्यात दोन्ही देशांनी यश मिळवले. आकाराने आणि लोकसंख्येने मोठे असलेल्या देशांचे हितसंबंध अनेकपरींचे असू शकतात, त्यामुळे अशा दोन देशांमध्ये मतभिन्नतेची शक्यताही असतेच, पण अशा मतभेदांना पुरून उरणारा सहकार्य-सेतू गेल्या २५ वर्षांत उभारला गेला. मात्र आताचे ट्रम्प प्रशासन हे निव्वळ गेल्या २५ वर्षांतल्या अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्याच नव्हे, तर एकंदर दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने स्वीकारलेल्या भूमिकांनाही मूठमाती देणारी धोरणे देशात आणि आंतरराष्ट्रीय संबंधांतही राबवताना दिसते आहे. 'अमेरिका फर्स्ट' हा ट्रम्प यांचा राजकीय जीवनरस. त्यातून येणारी धोरणे दुसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या काही दिवसांत अधिक धडाडीने राबवली जात आहेत. सरकारी यंत्रणाच कमी करणे, तंत्रज्ञान क्षेत्रावरली बंधने हटवणे, उत्पादक उद्योगांचे अमेरिकी भूमीतच पुनरुज्जीवन, स्थलांतराला चाप, देशाच्या सीमांवरला खुलेपणा नष्ट करणे आणि उदारमतवादाचे पंख कापून 'वोक' (फुरोगामी!) आग्रहांना अडगळीत फेकणे हा त्यांचा देशांतर्गत कृती-कार्यक्रम दिसतो. तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ट्रम्प यांना 'जागतिकतावादा'च्या विचारसरणीचा पाडाव करायचा आहे. कारण याच विचारसरणीने अमेरिकन लोकांवर व्यापार तूट, स्थलांतर आणि अनावश्यक लष्करी मोहिमांमधली जीवित- वित्तहानी यांचे ओझे लादले, असा विचार ट्रम्प करतात.

ट्रम्प यांची 'अमेरिका फर्स्ट' विचारधारा आणि त्यावर आधारलेला जागतिक दृष्टिकोन समजून घेणे- त्यातील अनेक विरोधाभासांना तोंड



देणे, हा या आठवड्यात भारतापुढे असलेल्या राजनैतिक आव्हानाचा एक भाग आहे; पण आक्रमक शैलीत वाटाघाटी करणाऱ्या ट्रम्प यांनाही 'डील' बनवण्याची- वाटाघाटी फलद्रूप करण्याची झ्र उत्सुकता आहेच, हे ओळखून आपले मुत्सद्दी चातुर्य दाखवून देणे, हा याच आव्हानाचा दुसरा भाग आहे.

ट्रम्प यांचा दृष्टिकोन फारच व्यवहारवादी आहे, त्याला विचारधारेचे अधिष्ठान नाही, अशी टीका आजवर भरपूर झालेली आहेच... पण हेच भारताच्या फायद्याचेही ठरू शकत नाही काय? तुम्ही जे पाहता तेच तुम्हाला मिळते आणि त्यात गोंधळात टाकणारे वैचारिक वक्तृत्व नसते. मोदीदेखील काही कमी व्यवहारी नाहीत. त्यांनी आणि त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक वळणे आणल्याचे यापूर्वी दिसलेले आहे आणि राष्ट्रीय हितांवर आधारित सौदे करण्याची क्षमताही दाखवून दिलेली आहे.

त्यामुळेच वॉशिंग्टनमध्ये हे दोघे नेते काय बोलणार आणि काय ठरवणार याकडे लक्ष द्यायला हवे. भारतातून आधी फ्रान्स आणि मग अमेरिका अशा दौऱ्यास निघतानाच मोदींनी या दौऱ्यात पाच प्रमुख क्षेत्रांवर भर असल्याचे जाहीर केले होते. व्यापार, संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि पुरवठा-साखळी ही ती पाच क्षेत्रे. या प्रत्येक क्षेत्रात अमेरिकेकडून आजही काहीएक आशा आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हे मोदींची स्तुती करतात खरे, पण भारताने लादलेले आयातकर अधिक असल्याची टीकाही ट्रम्प करतात. अशा वेळी भारताने हे आयातकर अमेरिकेसाठी कमी करण्याची तयारी ट्रम्प-मोदी भेटीपूर्वीच दाखवणे, हा एक चांगला संकेत ठरतो. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात अपूर्ण राहिलेल्या द्विपक्षीय व्यापार-वाटाघाटी यंदा पूर्ण करू, अशीही तयारी भारताने दाखवलेली आहे. पण दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प यांच्या अपेक्षा आणि व्यापार भागीदारीसाठी ते करत असलेल्या मागण्या यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ऊर्जा क्षेत्रात भारत हा पेट्रोलियमजन्य वा खनिज इंधनांचा प्रमुख आयातदार आहे आणि अमेरिका हा प्रमुख उत्पादक व निर्यातदार आहे, तिथे अधिक सहकार्यासाठी जागा आहे. अमेरिकेच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उद्योगाला चालना देण्यासाठी ट्रम्प अणुऊर्जेचे उत्पादन दुपटीने वाढवू पाहाताहेत आणि भारतही स्वतःच्या अणुऊर्जा क्षेत्राचा जलद विस्तार करू पाहातो आहे. भारत सरकारने अलीकडेच अण्वस्त्र कायद्यात सुधारणा करण्याचा (नुकसानाची जबाबदारी परकीय कंपनीवरच टाकणारी कलमे रद्द करण्याचा) आपला इरादा जाहीर केला आहे, परंतु ते प्रत्यक्षात आणण्यासाठी स्पष्ट संकेतांची मागणी अमेरिकेतर्फे केली जाऊ शकते.

संरक्षण सहकार्य हा गेल्या दोन दशकांमध्ये भारत-अमेरिका संबंधांचा प्रमुख आधारस्तंभ म्हणून उदयास आला आहे. भारताला अधिक अमेरिकी संरक्षणसामग्री विकण्यास ट्रम्प उत्सुक आहेत आणि दिल्ली तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सह-उत्पादनासाठी अधिक अनुकूल अटी शोधत आहे. दिल्ली आणि वॉशिंग्टन यांनी बायडेन प्रशासनाच्या अंतर्गत संरक्षण-औद्योगिक सहकार्यासाठी एक आराखडा विकसित केला. चीनच्या शस्त्रास्त्र निर्मितीच्या गतीचा सामना करण्यासाठी भारत व अमेरिका या दोन्ही देशांची लगबग सुरू असताना संरक्षण सहकार्याची व्याप्ती अधिक वाढणे क्रमप्राप्त होते. दोन्ही बाजूंनी संरक्षण सहकार्यासाठी अधिक महत्त्वाकांक्षी नवीन दहा वर्षांचा आराखडा तयार केला होताच, त्यापैकी पहिल्या टप्प्यावर २००५ मध्येच स्वाक्षरी झाली होती आणि दुसरी २०१५ मध्ये झाली होती. हे सहकार्य पुढे नेण्यासाठी दोन्ही देश काय करणार, याकडे २०२५ मध्ये लक्ष राहील.

अमेरिकेने भारताशी तांत्रिक सहकार्याला फार पूर्वीपासून प्राधान्य दिले आहे. बायडेन प्रशासनाच्या काळातच, कळीच्या उदयोन्मुख तंत्रज्ञानासाठी खास पुढाकार म्हणून 'इनिशिएटिव्ह ऑन क्रिटिकल अ‍ॅण्ड इमर्जिंग टेक्नॉलॉजी' (आय-सेट) स्थापन झाली होती. पण त्या वेळी 'एआय' तंत्रज्ञान चीनमध्ये स्वतंत्रपणे विकसित झालेले नव्हते. आता भारत आणि अमेरिका यांना चिनी एआयबद्दल निव्वळ साशंक राहण्यापेक्षा आणखी काही करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे अमेरिका आणि चीनमधील स्पर्धेचे क्षेत्र बनल्यामुळे, भारताला दोन गोष्टी एकाच वेळी कराव्या लागणार आहेत : वॉशिंग्टनशी गुणवत्तापूर्ण सहकार्य वाढवावे लागेलच पण आणि भारतातील 'एआय' आणि इतर तंत्रज्ञानाच्या प्रसारावर अमेरिकेचे नियंत्रण असू नये, याची काळजीही घ्यावी लागेल.


'पुरवठा साखळी लवचिक हवी' ही कल्पना ट्रम्प प्रशासनाच्या पहिल्या कार्यकाळात मांडण्यात आली होती, कारण तेव्हा कोविड महासाथीने या पुरवठा साखळ्या खिळखिळ्याही होऊ शकतात आणि सर्वच प्रकारच्या वस्तूंसाठी एकट्या चीनवरील अवलंबन गोत्यात आणू शकते, हे उघड झाले होते. चिनी उत्पादन व निर्यातीत भरभराट होत असल्याने, आजही हे अवलंबन वाढतच आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी पंतप्रधान मोदी हे ट्रम्प यांच्याशी चर्चेखेरीज अमेरिकन कॉर्पोरेट नेत्यांशीही संवाद साधू शकतील. मात्र या आघाडीवर अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

अर्थातच, ट्रम्प आणि वेगाने बदलणाऱ्या जागतिक व्यवस्थेला सामोरे जाण्याचे आव्हान केवळ मुत्सद्देगिरीने पेलता येणार नाही; त्यासाठी आपल्या देशातही मोठ्या प्रमाणावर सुधारणांची गरज ओळखून काम करावे लागेल.

# 'जशास तसे'च्या पलीकडे




डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच निर्णयांचा जो धडाका लावला आहे त्यातील एक म्हणजे अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्यांची त्यांच्या मायभूमीत पाठवणी करणे. त्यापाठोपाठ ब्रिटनने देखील तशाच पद्धतीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर, भारतात अवैध प्रवेश करणारे विदेशी, तसेच व्हिसा अटींचे उल्लंघन करणारे यांच्यावर कठोर कारवाईसाठी येऊ घातलेल्या विधेयकाकडे बघायला हवे. 'इतर देश आपल्या लोकांना परत धाडतात ना, आपणही आपल्याकडे बेकायदा राहणाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या देशांत परत पाठवायला हवे,' अशी 'जशास तसे' धाटणीची भाषा करणाऱ्यांना सध्या समाजमाध्यमांवर जोर चढलेला दिसतो. या अशा घुसखोरांना रोखायला हवे की नको, या प्रश्नाचे अगदी निःसंदिग्ध उत्तर 'हो' असेच. कारण या प्रकारचे घुसखोर म्हणजे निव्वळ देशाच्या शिरगणतीत झालेली वाढ नसते. उपलब्ध सोयीसुविधा, स्रोत, साधनसंपत्ती अशा असंख्य गोष्टींत बेकायदा वाढलेले ते वाटेकरी असतात. त्याखेरीज महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, इथल्या जमिनीशी आस्थेचे नाते नसल्याने समाज, समाजजीवन, तेथील सौहार्द, सलोखा या गोष्टींशी त्यांना देणेघेणे असण्याची शक्यता अगदीच कमी. त्यातून मग बेपर्वाई व पुढे समाजविघातकता, असा चढा क्रम लागण्याची शक्यता खूपच अधिक. त्यामुळेच, घुसखोरांना दोन ते सात वर्षांपर्यंतचा तुरुंगवास, पाच ते दहा लाखांपर्यंतचा दंड अशा शिक्षेची तरतूद असलेले विधेयक येणे स्वागतार्हच. मात्र त्याच वेळी, या घुसखोरांच्या अनुषंगाने काही प्रश्न आपण आपल्यालाच विचारावे लागतील. मुळात घुसखोर भारतात प्रवेश करतात कसे, प्रवेश केल्यावर ते बस्तान बसवतात कसे, त्यांना रेशन कार्ड, आधार कार्डसारखी ओळखपत्रे मिळतात कशी... हे ते प्रश्न. तर, अजस्र सरकारी यंत्रणेतील, प्रशासकीय यंत्रणेतील 'कच्चे दुवे', 'कच्ची माणसे' यामुळे हे सारे काही शक्य होते, हे उघड गुपित. या 'कच्च्या माणसां'वर प्रहार करणे हा घुसखोरांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा एक मार्ग आहे. त्या मार्गावर चालण्याची इच्छाशक्ती मात्र हवी. तसेच, यात नागरिकांची जागरूकताही महत्त्वाची. 'अमक्या ठिकाणी घुसखोर, तमक्या ठिकाणी घुसखोर...' अशा बातम्या कुठलीही शहानिशा न करता सोशल मीडियावर पुढे ढकलणे ही देशसेवा नव्हे. त्यापेक्षा असे काही संशयास्पद आढळल्यास आपल्या भागांतील लोकप्रतिनिधी, पोलिस व इतर यंत्रणांकडे त्याची माहिती देणे अधिक रास्त. थोडक्यात, जशास तसे या भाषेपलीकडचा हा प्रश्न आहे. त्याकडे तशाच नजरेतून बघायला हवे.



## महाराष्ट्राचे आराध्य दैवत

# छत्रपती शिवाजी महाराज

**महाभाग्यवान मी...महाराष्ट्र माझी मायभूमी...महाराजांचीच ही महतकरणी! शुक्रवारचा दिवस होता, रात्रीची वेळ होती.अवघ्या शिवनेरीच्या मुखावर औत्सुक्य, आनंद अन् काळजी झळकत होती. साऱ्या गडाचे लक्ष लागले होते... ते जिजाऊंकडे. शिवनेरीत बांधलेला पाळणा मोठ्या प्रतिक्षेत होता. क्षणातच आनंद उधळीत एक बातमी चोही दिशेला वाऱ्यासारखी पसरली. पुत्ररत्न झाला.. पुत्ररत्न झाला! गडावरील सारं वातावरण ढवळून निघालं होतं. गडावर सर्वत्र नागरे-चौघडे वाजू लागले होते. चोहीकडून एकच वार्ता कानावर पडत होती. जिजाऊंच्या उदरी पुत्ररत्न झाला... अर्थातच शिवबाचा जन्म झाला अन् जणू काय भारत मातेच्या रक्षणार्थ.. हिंदवी स्वराज्याचा क्रांतीसूर्यच उदयास आला. ह्या शुभ बातमीच्या प्रित्यर्थ रयतेचं तोंड गोड करण्यासाठी सर्वत्र साखरेचं वाटप झालं. लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाची झलक ठळकपणे दिसत होती. मांसाहेब जिजाऊंच्या मुखावर सोन्यावानी चमक झळकत होती. खरं तर, त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाशही ठेंगणं वाटत होतं. तो भाग्यवान दिवस म्हणजे १९ फेब्रुवारी.**

चला तर, शिवजयंतीनिमित्त आपण सर्वधर्मीय लोक शिवछत्रपतींच्या शौर्यगाथेला त्रिवार मानाचा मुजरा करूया अन् त्याबरोबरच शिव जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करूया! बोला...छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो! जय भवानी! जय शिवछत्रपती!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याण नगरीला महाराजांनी भारतातल्या पहिल्या आरमाराची स्थापना करण्याचा मान दिला. शत्रू पक्षाला गाफील ठेऊन गनिमी काव्याच्या युद्धतंत्राद्वारे शिवबाचे सैनिक कल्याण खाडीतून आपल्या आरमाराद्वारे हल्ले करायचे. केवळ भारतातल्या अंतर्गत शत्रूंनाच नव्हे तर, डच, पोर्तुगाल, इंग्रज, मोगल आदींना सुद्धा शिवछत्रपतींच्या आरमार यंत्रणेने जेरीस आणले होते.हिंदुस्थानाच्या इतिहासात सागरी बळाची उपयुक्तता व ताकद ओळखली ती शिवरायांनी. त्यांनी भारतीय आरमाराची या देशात सर्वप्रथम उभारणी केली. त्यामुळे शिवछत्रपतींना हिंदुस्थानी आरमाराचे (इंडियन नेव्ही) आद्यप्रणेते म्हणतात. महाराजांच्या जंगी बेड्यात सुमारे ७४ गलबते होती. अर्थातच शिवकालीन काळात महाराजांच्या आरमार दलाचा सर्वदूर दबदबा होता. दरम्यान दिपावलीच्या शुभमुहूर्तावर म्हणजेच २४ ऑक्टोबर १६५७ रोजी शिवरायांनी कल्याणला स्वतंत्र करून दुर्गाडीवर आपल्या हिंदुत्वाचा भगवा फडकवला. मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ कल्याणहून करत शिवरायांनी पुढे युद्धकौशल्याच्या बळावर सलग ४० किल्ले सर केलेत. राष्ट्रभक्तीसह हिंदुत्वाची भावना रयतेच्या मनात बिंबविण्याच्या दृष्टिकोनातून शिवबाने जिजाऊंच्या संकल्पनेतून दुर्गाडी किल्लयावर भवानीदेवीची प्रतिष्ठापना केली. यास्तव आम्ही कल्याणकर मांसाहेब जिजाऊ अन् शिवरायांचे ऋणाईत होऊन त्यांना त्रिवार नमन करतो.

मित्रहो, १६७४ साल उजाडलं अन् मराठी राज्याच्या इतिहासात एक नवं पर्व सुरू झालं. दरम्यानच्या काळात शिवराज्याभिषेक संदर्भात स्वकियांनी आणि परक्यांनी अनेक वेळा अडथळे आणलेत. त्यामुळे जिजामाता अत्यंत व्यथित झाल्या होत्या. त्या नेहमी शिवबाच्या राज्याभिषेकबाबत चिंतित असायच्या. शेवटी जिजामातांच्या अथक प्रयत्नांना यश आलं. काशीच्या गागाभट्टांना शिवबाच्या राज्याभिषेकचं पौरोहित्य सोपविण्यात आलं. या कारणास्तव रायगड नटूनथटून उभा होता. जिजाऊंच्या आनंदाला पारावारच उरला नव्हता. हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी रायगडावर मोठी गर्दी उसळली होती. रायगडाच्या प्रवेशद्वारावर देशी व परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी खरेखुरे गजराज उभे ठाकले होते. ६ जून १६७४ रोजी पहाटे पाचच्या सुमारास शिवबाचा राज्यारोहण सोहळा संपन्न झाला. तोफांच्या सलामीनं अन् तुतारींच्या निनादात किल्ले रायगडावरील वातावरण ढवळून निघालं होतं. याप्रसंगी शिवरायांच्या नावाचा सर्वत्र जयघोष होत होता. गुलालाची उधळण होऊन किल्लयाचा सारा परिसर भगवामय होऊन आनंदाने बहरून गेला होता. राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी महाराजांच्या नावापुढे छत्रपती अश्या एका अर्थानं नामकरण झालं. जिजाऊंच्या डोळ्यांचे पारणं फिटलं. जीवनाचं अखेरचं स्वप्न साकार झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी जणू एकाएक नाहिशी झाली होती. त्या तृप्त झाल्या. त्या धन्य झाल्या. त्यांना 'ह्याची देही ह्याची डोळा' शिवबाचा राज्याभिषेक पहावयास मिळाला.

राज्याभिषेक झाल्यानंतर शिवबा हे सिंहासनावर विराजमान झाले. त्या आधी त्यांनी गागाभट्ट आणि जिजाऊ मातेचं चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतले. जिजाऊ ह्या शिवछत्रपतींची दृष्ट काढत म्हणाल्या शिवबा तुम्ही राजा झालात, रयतेचे राजा झालात. महत्वाचे म्हणजे तुम्ही छत्रपती झालात. आता तुम्ही आदर्श राजा होऊन पृथ्वीवर किर्तीमान व्हा. शिवबाचा राज्याभिषेक व्हावा, यासाठी जिजाऊंनी आपला जीव जणू मुठीत घट्ट धरून ठेवला होता. कारण हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवबाला छत्रपती केल्यावर अवघ्या आठवड्यातच त्यांना देवाज्ञा झाली. धन्य त्या जिजाऊ मांसाहेब! आम्ही मराठी भूमिपुत्र वंदनीय जिजाऊ माँसाहेबांना त्रिवार मानाचा मुजरा करतो.

शिवबा हे मातृभक्त होते. ते मातेची आज्ञा शिरसावंद्य मानत असत. शिवबांचे पिताश्री शहाजीराजे हे आदिलशहाच्या दरबारी मोठे सरदार होते. परिणामी मराठा राज्याची संपूर्ण धुरा जिजाऊ माँसाहेबाच्या खांद्यांवर आली होती. दरम्यान जिजाऊंनी शिवबाला युद्धतंत्राचे परिपूर्ण प्रशिक्षण देऊन पारंगत केलं.शिवबाला आदर्श राजा बनविण्याचा जिजाऊंचा मानस होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांना राज्यकारभाराचे बारकावे ज्ञात करून देण्यात आले होते. शिवबाची मातृभक्ती अपरंपार होती, तर जिजाऊंचे पुत्रप्रेम अटूट होतं.

शिवबा हे मातेच्या आज्ञेप्रमाणे राज्यकारभार करत असत. विशेष म्हणजे ते मातेच्या आज्ञा शिरसावंद्य मानत असत. एके दिवशी मांसाहेबांनी मला कोंढाणा हवा आहे, अशी इच्छा व्यक्त केली असता, शिवरायांनी लगेच आपले शूरवीर विश्वासू सरदार तानाजी मालुसरे यांना कोंढाणाच्या दिशेने कूच करण्याचा फर्मान सोडला.त्याच दिवशी नेमका त्यांच्या मुलाचा लग्नसोहळा होता. तरी देखील तानाजींनी शिवबाची आज्ञा शिरसावंद्य मानून कोंढाण्यावर स्वारी करून तो सर केला. परंतु तानाजी धारातिर्थी पडले. त्यामुळेच शिवकालीन इतिहासात 'गड आला पण सिंह गेला' हे सुवर्णाक्षरात लिहिले गेले. इतकेच नव्हे तर, जिजाऊंच्या प्रेरणेतून शिवबा अन् त्यांच्या शुरवीर मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेची आई जगदंबेसमोर शपथ घेतली. शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजे संभाजी महाराजांनी स्वकियांची बंडाळी मोडीस काढून शंभरहून अधिक युद्धे जिंकली. या पार्श्वभूमीवरच शिवकालीन इतिहासाचा 'शिवशंभु कालखंड' असा उल्लेख केला जातो.

शिवबा हे परस्त्रीला मातेसमान मानत असत. स्त्री मग ती आपल्या राज्यातली असो वा परक्या मुलखातली, ती मातेसमानच असते, ही शिकवण शिवबांनी सैनिकांसह रयतेलाही दिली. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले असता, ही कृती महाराजांना अजिबात आवडली नाही. त्यांनी त्या परस्त्रीला मातेप्रमाणे आदरतिथ्य करून तिला तिच्या राज्यात सन्मानाने पोहोचविले. या घटनेला शिवकालीन इतिहास साक्षीदार आहे. अशीच एक अप्रिय घटना घडली की, एका गावप्रमुखाने स्त्रीच्या अब्रूची हेळसांड केली. हे कळल्यावर त्या दोषी व्यक्तीचे हातपाय तोडण्याची शिक्षा देण्याचा महाराजांनी फर्मान काढला. हे सर्व मांसाहेब जिजाऊंच्या संस्कारांचे फलित होते. शिवबा हे खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. स्त्रीयांना स्वरक्षण करता यावे, या उद्देशाने शिवरायांनी आपल्या राज्यातील महिलांना तलवारबाजीचे प्रशिक्षण देण्याची सोय केली होती. तात्पर्य, शिवरायांना स्त्रीयांबद्दल नितांत आदरभाव होता. वास्तवात शिवकालिन काळात स्त्रीला देव्हाऱ्यातली देवता मानायचे.

शिवबा हे शेतकऱ्यांचे हितचिंतक होते. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे, हा विचार त्यांनी रयतेला दिला. शिवरायांच्या उच्च सैनिकांत सर्वाधिक शेतकऱ्यांची मुलं होती, हे जाणून त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपण्यास नेहमी प्राधान्य दिलं.शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात बळीराजाला प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने, सर्वाधिक उत्पन्न काढणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन ते गौरवित असत. तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना शिवकाळात मोफत बी-बियाणे पुरविली जायची. तसेच शेतसारा किफायतशीर प्रमाणात आकारला जायचा. पडिक जमिनीची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्याकडून अर्थसहाय्य दिलं जायचं. दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतसारा माफ केला जात असे. वृक्ष तोड करू नये, असे कडक आदेश शिवरायांनी राज्यात काढले होते. शिवबा हे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यास अग्रक्रम देत असत. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली तर, राज्याला संपन्नता येईल, असे त्यांचे ठाम मत होते. शेतकऱ्याच्या पिकाच्या देठाला सुद्धा हात लावायचा नाही, असं सक्त फर्मान त्यांनी काढलं होते. शेती हा हिंदवी स्वराज्याचा पायाभूत उद्योग असल्यानं, युद्धकाळात उभ्या पिकांची नासाडी करणे, हा दंडनीय अपराध मानला जायचा. ह्या सर्व गोष्टी पाहिल्यावर शिव छत्रपती हे शेतकऱ्यांचे कैवारी होते, हे दृष्टोत्पत्तीस येते.

मोगल बादशहांच्या तुलनेने सैन्यदल व युद्धसामग्री कमी असूनही शिवछत्रपतींनी गनिमी कावा युद्धतंत्राचा अचूक प्रयोग करून शत्रूपक्षांना नामोहरम केलं.वास्तवात शिवरायांचे युद्धनैपुण्य अद्वितीय होतं. अफजलखानाचा वध, सुरतेची लूट, आग्राच्या नजरकैदेतून शिताफीने केलेली सुटका, शाहिस्तेखानवर हल्ला करत त्याच्या हाताची बोटं छाटणं, कोंढाण्याचा विजय या सर्व ऐतिहासिक घटनांमधील यश हे शिवबाच्या गनिमी कावाचे फलित होतं. त्यामुळेच आजही महापराक्रमी राजा म्हणून रयतेच्या मनावर त्यांचे अधिराज्य आहे

राज्याची मदार ही गडकिल्लयांवर आहे, हे जाणून शिवछत्रपतींनी राजगड, शिवनेर, पुरंदर, पन्हाळा, सिंहगड, विशालगड, प्रतापगड आदी किल्ले, कोट, जंजिरे उभारून राज्याची तटबंदी मजबूत केली. शिवकालीन राज्यव्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. राज्यकारभार पारदर्शक व गतिशील व्हावा, यासाठी शिवरायांनी अष्टप्रधान मंडळ नेमले होते. शिवकालीन नोकऱ्या अन् सैन्यभरती ही जाती-धर्मावर आधारित नव्हे तर, वैयक्तिक गुणवत्ता व युद्धनैपुण्यावर होत असे. राजाप्रती सरदार व सैनिकांची अपार निष्ठा तर, शिवबाचा त्यांच्यावरील दृढविश्वास असं एकमेकात अटूट बंध होतं. सैन्यदलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सरदार अन् सैनिकांना शिवबाच्या हस्ते बक्षिसे व उच्च पदे बहाल केली जात असत. यामुळेच शिवरायांची कुशल प्रशासक म्हणून रयतेत ख्याती होती. आजही त्यांचा आदर्श घेऊन महाराष्ट्राचा राज्यकारभार हाकला जात आहे, याचा आम्हा मराठी जनमानसाला सार्थ अभिमान आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची यंदा ३९५ वी जयंती साजरी होत आहे. शिव जयंती दिनानिमित्त शिवनेरी किल्ल्यासह राज्यभर वाजतगाजत, गुलाल उधळत ढोलताशांच्या निनादात छत्रपतींचा जयंती महोत्सव साजरा होणारच, हे त्रिकाल सत्य आहे.

मित्रहो, शिवरायांचा राज्याभिषेक रायगड किल्ल्यावर झाला अन् ते छत्रपती झाले. या किल्ल्यावरील शिव छत्रपतींच्या भव्यदिव्य पुतळ्याला अन् अन्य पवित्र देवस्थळांना कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या संकल्पनेतून अखंड पुष्पहार सेवा हा नाविन्यपूर्ण व अद्वितीय उपक्रम गेल्या ५ वर्षांपासून अविरत चालू आहे. सदर उपक्रमाला मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची प्रेरणा आहेच. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. या उपक्रमाचे नियोजन डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, मुख्यमंत्र्याचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटेसर आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील चिवटे बंधूंचे मुक्ताई मारमेट यांच्या संयुक्त विद्यमाने तनमनधनानं केलं जात आहे. ही गोष्ट शिवरायांचे ऐतिहासिक वैभव वृद्धिंगत करणारी असून, महाराष्ट्राच्या दृष्टीने खचितच गौरवास्पद आहे. वास्तवात शिवजयंतीनिमित्त हीच छत्रपती शिवाजी महाराजांना खरी आदरांजली आहे. चला तर, आपण सकल मराठी भूमिपुत्र वंदनीय शिवछत्रपतींना त्रिवार मानाचा मुजरा करूया।।

जय महाराष्ट्र!



# डोंबिवलीतील ६,५०० कुटुंबांना 10 दिवसांची मुदत
## बेघर होणाऱ्यांचा टाहो... मुख्यमंत्री फडणवीस स्पष्टच बोलले

■**मुंबई :** कल्याण डोंबिवली महापालिका परिसरातील बोगस महारेरा प्रकरणातील साडेसहा हजार रहिवाशी बेघर होण्याची शक्यता आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने ४८ इमारतींमधील रहिवाशांना पुढच्या १० दिवसांत घरे खाली करण्याची नोटीस बजावली आहे. त्यामुळे जगावे की मरावे असा प्रश्न या रहिवाशांसमोर उभा आहे. शेकडो नागरिकांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या गेट समोर एकत्र येऊन अधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. घर तुटण्याच्या भीतीने एका नागरिकाला चक्क अति दक्षता विभागामध्ये दाखल केल्याची माहिती येथील रहिवाशांनी दिली. तर, अनेकांनी आपलं घर तुटणार म्हणून टाहो देखील फोडल्याचे पाहायला मिळाले. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी याबाबत मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले आहे.

बांधकाम व्यवसायिकांनी केडीएमसी महापालिका क्षेत्रातील खोटे दस्तावेज सादर करत रेरामध्ये नोंदणी केल्याने ६५ इमारती कारवाईच्या रडारवर आल्या आहेत. आता, या बेकायदा ठरवण्यात आलेल्या इमारतींमधील साडेसहा हजार रहिवाशी बेघर होणार असल्याने येथील रहिवाशी हवालदिल झाले आहेत. बँकेने कर्ज दिले, पै पै जमा करून घर घेतले, आता चार वर्षांनी घर तोडण्याच्या नोटिसा धाडल्या. यात आमची चूक काय आहे? असा सवाल येथील रहिवाशी विचारत आहेत. तसेच, अनेकजण आपलं घर तुटलं जाणार म्हणून टाहो फोडत आहेत. मात्र, याप्रकरणी मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.






### सर्वोच्च न्यायालयात जाऊ- मुख्यमंत्री

कल्याण डोंबिवलीतील नागरिकांच्या बेकायदा घरासंदर्भात मी स्वतःबैठक घेतो आहे. गरजू लोकांना कसं वाचवतां येईल यासंदर्भात आम्ही सर्वोच्च न्यायालयात देखील जाऊ. आमदार रविंद्र चव्हाण यांनीदेखील ही घटना लक्षात आणून दिली आहे. तसेच, बिल्डरवर कारवाई करा असे पोलिसांना सांगितलं आहे. जे जेन्युईन बायर्स आहेत, त्याला कोर्टात जात कसं नियमित करायचं हा प्रश्न आहे. काही इमारती सरकारी जागेवर बांधल्या आहेत, असे उत्तर मुख्यमंत्री फडणवीसांनी कल्याण डोंबिवलीत अनिमियत घरांच्या पाडकामाबाबत दिले.

### बेघर होणाऱ्या नागरिकांबाबत खासदार शिंदेंची भूमिका

अनधिकृत बांधकाम तोडायला हवेत यासंदर्भात न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. येथे बिल्डरांनी बिल्डींग बांधल्या, लोक तिथे येऊन राहिले. आता, त्याच्यामध्ये काय मार्ग काढता येईल का यासाठी आम्ही काम करतोय. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक बेघर झाली आहेत, त्यांना वेगळ्या ठिकाणी एवढ्या शॉर्ट नोटीसवरती कसे ठेवता येईल हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे, कोणावरही अन्याय होणार नाही, याच्यासाठी कुठला मधला मार्ग आहे तो आम्ही काढण्याचा प्रयत्न करू, असे कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटले. येथील लोक अजूनपर्यंत बेघर झालेले नाहीत, महानगरपालिका आणि कोर्ट यांच्यासह संबंधित लोकांसोबत समन्वय साधून कशाप्रकारे कुटुंबीयांना न्याय मिळेल हे पाहू. जवळपास हे ६५०० लोक आहेत, त्या लोकांना कशाप्रकारे बेघर होण्यापासून वाचवता येईल याचा प्रयत्न सुरू आहे. बिल्डर इमारत बांधून फारार झाले आहेत, लोक त्यामध्ये अडकले आहेत. लोकांवर हा कठीण प्रसंग आलेला आहे, मार्ग काढण्यासाठी महापालिका प्रयत्न करत आहे, असेही खासदार शिंदे यांनी म्हटले.

---

# ई कार्यालयाची अंमलबजावणीसाठी आयुक्तांची ताकीद
## उल्हासनगरच्या आयुक्तांचे स्पष्ट आदेश, शिस्तभंगाच्या कारवाईचाही इशारा

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी काही दिवसांपूर्वी राज्यातील सर्वच महापालिकांमध्ये ई कार्यालय प्रणाली लागू करणे अनिवार्य केले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजातही संगणकाचा अधिकाधिक वापर करुन प्रशासकीय कामकाज गतीमान व्हावे यासाठी ई कार्यालय प्रणाली लागू करण्यात आली. कामकाजात सुसूत्रता येण्यासोबतच दस्तऐवज सुरक्षित ठेवणे, माहिती तात्काळ आणि जलद गतीने देणे. तसेच निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या ई-कार्यालय प्रणालीची अंमलबजावणी शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सुरु झाली.

■**उल्हासनगर :** पालिकेचे कामकाज गतीमान व्हावे आणि निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी ई कार्यालय प्रणालीची अंमलबजावणी करू पाहणाऱ्या उल्हासनगर महापालिका आयुक्तांना त्यांचे विभाग प्रमुख प्रतिसाद देत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे उल्हासनगर महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी सर्व विभागांना सक्त ताकीद दिली असून प्रत्येक विभागाने कामकाज ई कार्यालयामध्ये करण्याचे आदेश दिले आहेत. याकडे दुर्लक्ष करणाऱ्या विभागांवर शिस्तभंगाच्या कारवाईचाही इशारा देण्यात आला आहे. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना याबाबतची माहिती व्हावी म्हणून ई- कार्यालय संगणक प्रणालीचे प्रशिक्षण




सर्व विभागांना देण्यात आले होते. त्यानंतर विभागांनी आपापल्या विभागाच्या संचिका याच पद्धतीने पाठवणे अपेक्षित होते. मात्र यामध्ये २१ विभागांनीच आपल्या संचिका ई-कार्यालय प्रणालीव्दारे पाठविल्या. मात्र उर्वरित विभागांनी ई-कार्यालय प्रणालीचा अवलंब केला नसल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. त्यामुळे आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी याबाबत नाराजी व्यक्त करत खेद नोंदवला आहे. मात्र येत्या १५ मार्च पर्यंत संपूर्ण कामकाज ई कार्यालयामध्ये परावर्तीत करायची असल्याची ताकीद आयुक्तांनी दिली आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाला काही लक्ष्य देण्यात आले आहेत. त्यानुसार विभागांनी विभागांनी यापुढे त्यांच्या विभागातील सर्व कामकाज ई-कार्यालयत प्रणालीव्दारे करुन कामकाजाचा साप्ताहिक, पंधरवडा आणि मासिक अहवाल भरुन माहिती तंत्रज्ञान विभागाकडे न चुकता सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यात विलंब करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे. त्यामुळे उल्हासनगर महापालिकेतील कामचुकार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

---

# गणेश नाईकांचा ठाण्यातील जनता दरबारचा मुहूर्त ठरला
## एकनाथ शिंदेच्या बालेकिल्ल्यात फेब्रुवारी महिन्यातील...




■**ठाणे :** नवी मुंबईतील भाजपचे नेते आणि राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार घेण्यासंबंधी केलेल्या केल्यानंतर भाजप आणि शिवसेनेत (शिंदे गट) शीतयुद्ध सुरू झाले आहे. या दोन्ही पक्षाचे वरिष्ठ नेत्यांमध्ये शह-काटशहाचे राजकारण सुरु असतानाच, गणेश नाईक यांच्या जनता दरबाराचा मुहुर्त अखेर ठरला आहे. येत्या सोमवारी म्हणजेच २४ फेब्रुवारी रोजी ठाण्यातील खारआळी भागातील रघुवंशी हॉलमध्ये हा जनता दरबार होणार आहे. बालेकिल्ल्यात होणाऱ्या या जनता दरबाराचे बॅनर शहरभर झळकू लागल्याने शिवसेनेत (शिंदे गट) अस्वस्थता पसरली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ठाणे शहर हे ओळखले जाते. शिवसेनेतील फुटीनंतर झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिंदे यांनी तेच ठाणेदार असल्याचे दाखवून दिले होते. याच बालेकिल्ल्यात जनता दरबार घेण्याची घोषणा मंत्री गणेश नाईक यांनी काही दिवसांपुर्वी कोपरीतील कार्यक्रमादरम्यान केली होती. त्यावर शिवसेना (शिंदे गट) नेत्यांनी प्रतिक्रियाही व्यक्त केल्या होत्या. त्यानंतरही नाईक यांनी आणखी एक विधान केले होते. ठाणे हे आपले सर्वांचेच असल्याचे सांगत या शहरातील अडीअडचणी सोडविण्यासाठी गरज पडली तर, अधिकाऱ्यांची बैठक घेऊ, असे विधान नाईक यांनी ठाण्यातील माघी गणेशोत्सव दर्शनादरम्यान केले होते. या विधानाचीही बरीच चर्चा झाली होती.

नाईक यांच्या विधानानंतर भाजप विरुद्ध शिवसेना (शिंदे गट)असा सामना रंगला होता. असे असतानाच, नवी मुंबई येथील ऐरोलीमध्ये मेळाव्यात काँग्रेसचे नेते व माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. या कार्यक्रमादरम्यान मी कधीही दरबारी राजकारण केले नाही असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले होते. या निमित्ताने शिंदे यांनी नाईक यांना टोला लगावल्याची चर्चा शहरात रंगली आहे. एकूणच दोन्ही नेत्यांमध्ये शह-काटशहाचे राजकारण सुरु असल्याचे चित्र आहे. असे असतानाच, गणेश नाईक यांनी ठाण्यातील जनता दरबाराची तारिख अखेर जाहीर केली असून त्याचे बॅनर आता शहरभर झळकताना दिसून येत आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांनी केलेल्या घोषणेनंतर त्यांचा जनता दरबार शहरात केव्हा होणार याविषयी चर्चा रंगल्या होत्या. नाईक यांनी जनता दरबाराची तारीख जाहीर केल्याने आता या चर्चांना पुर्णविराम मिळाला असून येत्या सोमवारी म्हणजेच २४ फेब्रुवारी रोजी ठाण्यातील खारआळी भागातील रघुवंशी हॉलमध्ये हा जनता दरबार होणार आहे. त्याचे बॅनर शहरातील चौका-चौकात लावण्यात आले आहेत. शिवसेनेचा (शिंदे गट) बालेकिल्ला असलेल्या ठाणे शहरात मंत्री नाईक यांचा जनता दरबार आयोजित करण्यात आल्याने शिवसेनेत (शिंदे गट) अस्वस्थता पसरली आहे.

---

# कल्याणमधील महिलेची एम.बी.बी.एस. प्रवेशाच्या नावाने पाच लाखाची फसवणूक

■ **कल्याण :** कल्याण पश्चिमेतील खडकपाडा गंधारनगर भागातील दोन इसमांनी एम. बी. बी. एस. प्रवेशाच्या नावाखाली येथील एका महिलेची पाच लाख १० हजार रूपयांची फसवणूक केली आहे. या फसवणूक प्रकरणी महिलेने खडकपाडा पोलीस ठाण्यात शनिवारी तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

तक्रारदार महिला या कल्याणमधील गोकुळनगरी गंधारनगर भागातच राहतात. एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. दोन संशयित यांच्या विरुध्द तक्रारदार महिलेने आर्थिक फसवणूक केल्याचा आणि बदनामी केली तर जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार खडकपाडा पोलीस ठाण्यात शनिवारी केली आहे.

तक्रारदार महिलेने पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की माज्या मुलाला अहमदनगर येथील विखे पाटील महाविद्यालयात एम. बी. बी. एस. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश हवा होता. हा प्रवेश करून देण्याचे आमिष एक इसम आणि त्यांच्या स्वीय साहाय्यकाने दाखविले. या प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधितांनी आपल्याकडून रोख आणि ऑनलाईन माध्यमातून पाच लाख ५० हजार रुपए




स्वीकारले. आपल्या मुलाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली आहे, असे मला भासविण्यात आले. प्रत्यक्षात प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली नाही, असे तक्रारदार महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्याने आपण आपले पैसे परत मागण्याचा प्रयत्न केला. या रकमेतील संबंधितांनी आपणास ४० हजार रुपए परत केले. उर्वरित रक्कम परत केली नाही. उर्वरित रक्कम परत मागण्याचा तगादा लावूनही ती रक्कम अद्याप परत करण्यात आलेली नाही. त्यामुळे आपली आर्थिक फसवणूक संबंधितांनी केली. सतत पैसे परत मागण्याचा तगादा लावला, आपली बदनामी केली तर आपणास जीवे ठार मारण्याची धमकी संबंधितांनी दिली आहे. त्यामुळे आपण दोन्ही इसमांविरुध्द कायदेशीर तक्रार करत आहोत, असे तक्रारदार महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणाची तक्रार दाखल होताच खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांच्या आदेशावरून संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. साहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड याप्रकरणाचा तपास करत आहेत.


कर्ज मिळवून देतो असे सांगून काही जणांना कल्याण, पनवेल, ठाणे परिसरातील काही नागरिकांची बँक प्रक्रिया शुल्क घेऊन फसवणूक केल्याचे कल्याणमधील प्रकरण ताजे असतानाच आता हे प्रकरण उघडकीला आले आहे. कल्याण शहर परिसरात काही जण गुंतवणूक, प्रवेश अशा विविध माध्यमांतून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार काही दिवसांपासून वाढले आहेत.

---

# घरामध्ये ९० गोण्या भरून गुटखा
## घरामधूनच सुरू होता पान टपऱ्यांवर सप्लाय

■**ठाणे :** ठाण्यातील वागळे इस्टेट भागात एका घरामध्ये सुमारे ९० गोण्या भरून गुटखा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली आहे. तर त्याच्या दुसऱ्या साथिदाराचा पोलीस शोध घेत आहेत. घरामधूनच वागळे इस्टेट भागातील टपऱ्यांवर या गुटख्याचा साठा पुरविला जात असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

वागळे इस्टेट येथील आंबेवाडी परिसरात एका घरामध्ये मोठ्याप्रमाणात गुटख्याचा साठा साठविला जात असल्याची माहिती वागळे इस्टेट पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, वागळे इस्टेट पोलिसांच्या पथकाने मदिना मशीदीजवळील एका घरामध्ये पोलिसांनी छापा मारला. त्यावेळी घरामध्ये एकजण आढळून आला. पोलिसांनी घरामध्ये जाऊन पाहाणी केली असता, तेथे पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये गुटख्याची पाकिटे आढळून आली. पोलिसांनी घरामधील व्यक्तीला हा गुटखा कोणाचा आहे? कोणाला विक्री करणार होते? असे विचारले असता, त्याने हा साठा त्याच्या साथिदाराचा असल्याचे सांगितले. तसेच तो साथिदाराच्या मदतीने वागळे इस्टेट भागातील पान टपऱ्यांवर या गुटख्याची विक्री करत असल्याचे समोर आले. या घरातून पोलिसांनी ८६ गोण्यांमधून तब्बल २ लाख २१ हजार ८६५ रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. या





प्रकरणात वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १२३, २७५, २२३, ३ (५) सह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६ (२) (१), कलम २६ (२) (४), कलम २७ (२) (ई), कलम २७ ( ३) (ड), कलम २७ (३) (ई), कलम ३० (२) (अ), कलम ५९ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी एकाला अटक केली आहे. तर दुसऱ्या संशयिताचा पोलिसांकडून शोध सुरू आहे अशी माहिती वागळे इस्टेट पोलिसांनी दिली.

या कारवाईमुळे शहरात गुटख्याची विक्री सुरू असल्याचे समोर आले आहे. शहरातील टपऱ्यांवर मोठ्याप्रमाणात गुटख्याची विक्री होत असते. अनेकदा या टपऱ्यांवर अमली पदार्थांची विक्री होत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या टपऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी देखील अनेकदा पुढे आली होती. शहरातील या टपऱ्यांवर अनेकदा गुटख्याचा साठा आढळून आला होता.

---

# ठाण्यातील दाटीवाटीच्या लोकवस्तीत घराच्या बेडरुममध्येच वेश्या व्यवसाय

■ **ठाणे :** गेल्या काही वर्षांपासून ठाण्यात अनेक ठिकाणी वेश्या व्यवसायाचा पदार्फाश झाला आहे. ठाणे पोलिसांनी नुकत्याच केलेल्या एका कारवाईत भर लोकवस्तीमध्ये वेश्या व्यवसाय चालविले जात अल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाने या प्रकरणात एका दलालाला अटक केली आहे. घरातील बेडरुममधून तो वेश्या व्यवसाय चालवित असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.



ठाणे शहरातील घोडबंदर भाग असेल वा जुन्या ठाण्याची वस्ती. अनेक ठिकाणी वेश्या व्यवसायाचा ठाणे पोलिसांनी पदार्फाश केला आहे. नौपाडा जवळील तीन पेट्रोल पंप परिसरात तर एका मसाज पार्लरमध्ये वेश्या व्यवसाय चालविला जात होता. त्यातच, आता अतिशय दाटीवाटीचा परिसर असलेल्या वर्तकनगर जवळील यशोधननगर भागात भर दाटीवाटीच्या वस्तमध्ये वेश्या व्यवसाय, चालविला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चारच दिवसांपूर्वी ठाणे पोलिसांनी या भागात कारवाई केली. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना या भागात दत्ताराम सावंत (५८) हा व्यक्ती वेश्या व्यवसाय चालवित असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे, ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे (क्राईम ब्रांच) उपायुक्त अमरसिंह जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दीपक वालगुडे, दीपक भोसले, पोलीस हवालदार किशोर पाटील, महिला पोलीस अमलदार हर्षदा थोरात, भाग्यश्री पाटील, किरण चांदेकर, चालक पोलीस शिपाई उदय घाडगे यांच्या पथकाने सापळा रचला. त्यांनी बनावट ग्राहक तयार करुन दत्ताराम सावंत याच्याशी संपर्क साधला. त्याने पाच हजार रुपयांच्या मोबदल्यात महिला पुरवित असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्या इमारतीत बनावट ग्राहकाच्या मदतीने छापा टाला. या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या दत्ताराम सावंत याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी करून पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्या घरामध्ये एका बेडरुममधून तो हा वेश्या व्यवसाय चालवित असल्याची माहिती पुढे आली.

दत्ताराम सावंत याच्याविरोधात वर्तकनगर पोलीस ठाण्यात स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (सिट अधिनियम पुनर्निर्मित) - ३,४,५ ; भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १४३ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात पोलिसांनी दत्ताराम सावंत याच्या तावडीतून महिलेची सुटका केली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

---

# उल्हासनगरमध्ये इलेक्ट्रोपॅथी डॉक्टरकडून रुग्णांना ॲलोपॅथीची औषधे
## डॉक्टर दीपक सजनानी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल

■**कल्याण :** उल्हासनगर पाचमधील नेताजी चौकातील श्रेयस दवाखान्याचे डॉक्टर दीपक सजनानी यांच्याकडे इलेक्ट्रोपॅथीची पदवी असताना ते ॲलोपॅथीचे औषधे रुग्णांना देत आहेत. त्यांच्याकडे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या वैद्यकीय सेवा नोंदणीचे प्रमाणपत्र नसताना ते रूग्ण सेवा देत असल्याचे आढळून आल्याने महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, ठाण्यातील गृह विभागाचे नायब तहसीलदार यांच्या प्राप्त पत्रावरून उल्हासनगर पालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून हिललाईन पोलिसांनी डॉक्टर दीपक सजनानी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.




उल्हासनगर पालिकेच्या नागरी सेवा केंद्रातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. जोत्सना शिंदे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. उल्हासनगर पाचमधील नेताजी चौकातील श्रेयस दवाखान्याचे चालक डॉ. दीपक सजनानी यांच्या विषयी काही जागरूकांनी चार वर्षापूर्वी महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे तक्रारी केल्या होत्या. डॉ. सजनानी यांच्याकडे वैद्यकीय परिषद नोंदणीचे प्रमाणपत्र नसल्याचे, त्यांच्याकडे इलेक्ट्रोपॅथी, नॅचरोपॅथी, बाल रुग्ण सेवेची प्रमाणपत्र असताना ते ॲलोपॅथीचे औषधे रुग्णांना देत असल्याच्या तक्रारींचे स्वरूप होते.

या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उल्हासनगर पालिकेच्या मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांच्या नेतृत्वाखाली डॉ. शुभांगी देवरे, डॉ. सत्यम गुप्ता, डॉ. ज्योत्सना शिंदे, डॉ. उत्कर्षा शिंदे, डॉ. वैशाली नाईक, परिचारक सुरेंद्र पिलानी, हिललाईन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक साळवे हे पथक अचानक दीड महिन्यापूर्वी डॉ. सजनानी यांच्या श्रेयस दवाखान्यात दाखल झाले. त्यावेळी डॉ. सजनानी रुग्ण तपासत होते. डॉ. मोहिनी धर्मा यांनी डॉ. सजनानी यांच्याकडे वैद्यकीय शैक्षणिक अहर्तेबाबत चौकशी केली. त्यावेळी त्यांच्याकडे बी. ई. एम. एस. (इलेक्ट्रोपॅथी) पदवी आढळून आली. तसेच बाल रुग्ण सेवेचे प्रमाणपत्र, नॅचरोपॅथीचे प्रमाणपत्र आढळले. दवाखान्यात ॲलोपॅथी औषधे आढळून आली. सिध्दा मुग्धा प्रयोगशाळा प्रमाणपत्र, एन. ई. एच. एम.चे प्रमाणपत्र आढळले. वैद्यकीय सेवेचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना डॉ. सजनानी रुग्ण सेवा देत असल्याचे तपास पथकाला आढळले.

घटनास्थळी सापडलेली औषधे, प्रमाणपत्रे यांचा पंचनामा करण्यात आला. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना डॉ. सजनानी रुग्ण सेवा देत असल्याचे आणि सामान्य लोकांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आल्याने उल्हासनगर पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्सना शिंदे यांनी डॉ. सजनानी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी वैद्यकीय व्यवसाय अधिनियमाने गुन्हा दाखल केला आहे. पोलीस याप्रकरणाचा तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com